**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

### करिअर कट्टा उपक्रम

# डिजिटल प्रॉडक्टिव्हिटी विषयावर प्रशिक्षण!



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**राजगुरूनगर :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना 'डिजिटल प्रॉडक्टिव्हिटी' या विषयाचे मोफत प्रशिक्षण युनिसेफच्या सहकार्याने देण्यात आले. राज्यात सुमारे १ लाख ११ हजार १११ हून अधिक विद्यार्थ्यांना डिजिटल प्रॉडक्टिव्हिटीचे प्रशिक्षण देऊन विश्वविक्रम करण्यात आला आहे.

सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या उपक्रमाचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी करिअर कट्टा समन्वयक डॉ. संजय शिंदे, प्रा. पूनम तापकीर आणि करियर संसदेचे पदाधिकारी उपस्थित होते.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**